आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भूमिका निव्वळ तटस्थतेची नाही तर शांततेच्या समर्थनाची असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- शेतकऱ्यांच्या समस्या सोडवणं सोपं व्हावं यासाठी विभाग स्तरावर कृषी मंत्री कक्ष स्थापन करण्यात येणार असल्याची कृषी मंत्र्यांची माहिती

- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर ग्रुपची स्थापना

- घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनवाढीच्या दरात किंचित घसरण

- मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ४ कोटी ९३ लाख रुपये किमतीचे हिरे जप्त

**आणि**

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा आज उत्तराखंडमधे हल्दवानी इथं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपला दोन दिवसांचा अमेरिका दौरा आटपून आज मायदेशी परत यायला निघाले. या दौऱ्यात त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासह तिथल्या अनेक वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली. अमेरिकेच्या गुप्तचर विभाग प्रमुख तुलसी गबार्ड, तसंच विविध आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या कंपन्यांच्या प्रमुखांशी मोदी यांनी चर्चा केली. ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर भारत-अमेरिके दरम्यानची ही पहिलीच द्विपक्षीय चर्चा होती.

प्रधानमंत्री मोदी यांच्या अमेरिका भेटीत दोन्ही देशांमध्ये व्यापार, उद्योग, संरक्षण आणि सुरक्षा, ऊर्जा, तसंच दोन्ही देशांच्या नागरिकांमधल्या परस्पर संबंधांसह विविध मुद्द्यांवर उच्च स्तरीय द्विपक्षीय चर्चा झाली. भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर प्रकल्पावर एकत्रितपणे काम करण्यावर दोन्ही देशांमध्ये यावेळी सहमती झाली.

प्रधानमंत्री मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात काल व्हाईट हाऊस मध्ये झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त निवेदन जारी केलं. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भूमिका निव्वळ तटस्थतेची नसून, शांततेच्या समर्थनाची असल्याचं मोदी यांनी यावेळी स्पष्ट केलं.

यावेळी दोन्ही देशांमध्ये १६ वर्षांपूर्वी झालेल्या ऐतिहासिक नागरी अणु करारा अंतर्गत, भारतात अमेरिकी संरचनेच्या अणुभट्ट्यांची निर्मिती करण्याच्या दिशेने पुढे जाण्यावर दोन्ही नेत्यांमध्ये सहमती झाली.

मुंबई दहशतवादी हल्ल्यासारख्या कारवाया रोखण्यासाठी अल-कायदा, आयसिस, जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तय्यबा यासारख्या दहशतवादी गटांविरोधात सहकार्य मजबूत करण्यासाठी वचनबद्ध राहण्याचा दोन्ही नेत्यांनी यावेळी संकल्प केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उद्योगपती गौतम अदानी यांच्याशी संबंधित भ्रष्टाचार प्रकरण दडपत असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. प्रधानमंत्र्यांना देशात प्रश्न विचारले जातात, तेव्हा ते मौन बाळगतात, आणि परदेशात विचारले जातात तेव्हा ती वैयक्तिक बाब असल्याचं सांगतात. मोदी यांनी अमेरिकेतही अदानींच्या भ्रष्टाचारावर पांघरूण घातलं आहे, असं राहुल गांधी यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

नवीन फौजदारी कायद्यांच्या महाराष्ट्रातल्या अंमलबजावणीचा आढावा आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

शेतकऱ्यांच्या समस्या सोडवणं सोपं व्हावं यासाठी विभाग स्तरावर कृषी मंत्री कक्ष स्थापन करण्यात येणार असल्याचं कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितलं. नागपूर इथं प्रगतीशील शेतकऱ्यांच्या परिसंवाद कार्यक्रमात ते काल बोलत होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाकडून अनेक योजना, उपक्रम राबवले जात आहेत, शासन शेतकऱ्याच्या पाठीशी भक्कमपणे उभं आहे, असं कोकाटे म्हणाले. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

<><><><><>

डाळवर्गीय पिकांसदर्भात संशोधन आणि पायाभूत सुविधांच्या विकासात खासगी क्षेत्राने सहभाग घ्यावा, असं आवाहन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आज केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित भारतीय डाळी परिषदेत ते बोलत होते. या परिषदेत आज समृद्धीसाठी डाळी - शाश्वततेसह पोषण’ या चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. यात रावल यांनी महाराष्ट्रातल्या डाळी उत्पादनातल्या विविधतेचा उल्लेख केला.

<><><><><>

जागतिक पातळीवरचं तंत्रज्ञान शिकण्याची संधी आणि त्यासाठी आवश्यक असणारं मनुष्यबळ भारतात उपलब्ध करण्याच्या उद्देशानं उभारल्या जाणार असलेल्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी सेंटर फॉर एक्सलन्सचं लवकरच भूमीपूजन करण्यात येणार असल्याचं सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी काल पुणे इथं सांगितलं. ते २३ व्या पीफ अर्थात पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

<><><><><>

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनेची बांधणी आणि पक्षाच्या महत्वाच्या धोरणांच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कोअर ग्रुपची स्थापना केल्याचं प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, कार्याध्यक्ष प्रफुल पटेल राष्ट्रीय, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ आणि धनंजय मुंडे यांचा यात समावेश करण्यात आला आहे.

<><><><><>

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनवाढीच्या दरात किंचित घसरण झाली असून जानेवारी महिन्यात तो २ पूर्णांक ३१ शतांश टक्क्यांवर आला. डिसेंबर २०२४ मधे तो २ पूर्णांक ३७ शतांश टक्के होता.

कांदे बटाटे वगळता, भाज्या आणि खाद्यपदार्थांच्या किमतीत तसंच इंधनाच्या किमतीत काहीशी घसरण झाल्यामुळे महागाई निवळल्याचं सरकारी आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><><>

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप उत्तराखंडमधल्या हल्दवानी इथं आज होत आहे. दुपारी होणाऱ्या समारोप समारंभात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, केंद्रीय क्रीडा आणि युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे आणि ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांची या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती असेल.

पदकतालिकेत सेना दल संघ पहिल्या क्रमांकावर आहे. ६८ सुवर्ण, २६ रौप्य आणि २७ कांस्य पदकांसह त्यांनी एकूण १२१ पदकं जिंकली आहेत. महाराष्ट्रानं सर्वात जास्त १९८ पदकं जिंकली आहेत, यात ५४ सुवर्ण, ७१ रौप्य आणि ७३

कांस्य पदकांचा समावेश आहे. हरियाणा ४८ सुवर्ण, ४७ रौप्य आणि ५८ कांस्य पदकांसह एकूण १५३ पदकं जिंकून तिसऱ्या स्थानावर आहे.

<><><><><>

न्यू इंडिया सहकारी बँकेवर रिझर्व्ह बँकेनं काल अनेक निर्बंध घातले. यामुळे बँकेला बचत खातं, चालू खातं किंवा ठेवीदाराच्या इतर कुठल्याही खात्यातून रक्कम काढता येणार नाही. रिझर्व्ह बँकेच्या अटींच्या अधीन राहून कर्ज फेड करता येईल, मात्र १३ फेब्रुवारीपासून नवीन कर्ज देता येणार नाही किंवा गुंतवणूक करता येणार नाही. तसंच हे निर्बंध पुढले सहा महिने लागू राहतील, असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

<><><><><>

कोल्हापूरच्या चंदगड इथं गुईलेन बॅरे सिंड्रोमग्रस्त महिला रुग्णाचा मृत्यू झाला आहे. या महिलेवर गेल्या काही दिवसांपासून छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात उपचार सुरू होते. या आजारामुळं राज्यात झालेला हा ९वा मृत्यू आहे. राज्यात गुईलेन बॅरे सिंड्रोमचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत.

<><><><><>

सीआयएसएफ अर्थात केंद्रीय औद्योगिक संरक्षण दलाच्या अधिकाऱ्यांनी काल मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुमारे ४ कोटी ९३ लाख रुपये किमतीचे हिरे जप्त केले. या हिऱ्यांची तस्करी करणाऱ्या तस्कराला अटक करण्यात आली असून अधिक चौकशीसाठी त्याला विमानतळावरच्या गुप्तचर विभागाकडे सोपवलं आहे.

<><><><><>

बनावट प्रमाणपत्र देऊन आरक्षणाचा लाभ घेतल्या प्रकरणी आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरला सर्वोच्च न्यायालयाने येत्या १७ मार्चपर्यंत दिलासा दिला आहे. या काळात तपासाला सहकार्य द्यावं असं न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना

आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या पीठाने बजावलं आहे. पूजा खेडकरच्या जामीन अर्जाबाबत जबाब दाखल करायला सरकारी वकिलांनी आणखी मुदत मागितली, तेव्हा येत्या ३ आठवड्यात जबाब दाखल करावा असं न्यायालयाने सांगितलं.

**<><><><><>**

समाजमाध्यमांवर वादग्रस्त वक्तव्य केल्याबद्दल रणवीर अलाहाबादियावर दाखल झालेल्या एफ आय आरच्या विरोधात त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजीव कुमार यांच्या खंडपीठाने त्याच्या याचिकेवर आज तातडीने सुनावणी करायला नकार दिला असून क्रमानुसार येत्या २ -३ दिवसात याचिकेवर सुनावणी करु असं सांगितलं.

अलाहाबादिया आणि इंडियाज गॉट लॅटेन्ट या कार्यक्रमाचा निर्माता समय रैना याला आसाम पोलिसांनी चौकशीसाठी हजर व्हायला सांगितलं आहे. आशीष चंचलानी, जसप्रीत सिंग, आणि अपूर्वा मखीजा यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल आहे.

महाराष्ट्र पोलिसांच्या सायबर विभागानेदेखील माहिती तंत्रज्ञान विषयक कायद्याखाली त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून संबंधित कार्यक्रम यू ट्यूबवरुन हटवण्याचे निर्देश दिले आहेत.

मुंबईच्या खार पोलीस ठाण्यात अलाहाबादियाला चौकशीसाठी बोलावलं होतं, तर समय रैनाला आजच्या आज चौकशीसाठी हजर राहण्याचं समन्स जारी केलं आहे.

**//<><><><><>//**